# तहसिलदार अमरावती यांचे न्यायालय

**रा.मा.क्र. एम.आर.सी-८१/नांदगाव पेठ भाग २- ४५४/२०२३-२४**

अर्जदार- सिटीलॅन्ड एंपायर भागीदारी फर्म तर्फे भागीदार सुभाष नानकराम तलडा व इतर ५ रा. अमरावती, ता,जि.अमरावती

**आदेश**

बांधकाम परवानगी आदेश

(पारीत दिनांक- ३०/ ०५/२०२४)

अर्जदार सिटीलॅन्ड एंपायर भागीदारी फर्म तर्फे भागीदार सुभाष नानकराम तलडा व इतर ५ रा. अमरावती, ता,जि.अमरावती यांनी तहसिलदार अमरावती यांचे आदेश क्र. रा.मा.क्र.एन.ए.पी.३४/नांदगाव पेठ भाग २-२०/२०२३-२०२४ आदेश दि. २५.०८.२०२३ अन्वये वाणिज्य प्रयोजनार्थ अकृषक मंजुर करण्यात आलेल्या मौजा नांदगाव पेठ भाग-२ ता.जि.अमरावती येथिल सर्व्हे क्र.४६१/१/ब/क मधिल प्लॉट क्र. १ क्षेत्र १५२३०.०० चौ.मि. जागेवर वाणिज्य प्रयोजनाकरीता बांधकाम करण्याची परवानगी मिळणेबाबत दिनांक २५.०८.२०२३ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन प्रकरण पंजीबध्द करण्यात आले. अर्जासह अर्जदाराने गाव नमुना ७/१२ मंजुर अकृषक आदेश व बांधकाम अभिन्यासाची प्रती व इतर दस्तऐवज दाखल केला.

सदर प्रकरणी या कार्यालयाचे पत्र क्र. प्रस्तु-१/बांध-प/ कावि-३५६३/२०२३, दिनांक २६.०९.२०२३ नुसार सहायक संचालक नगर आणि मुल्यनिर्धारण शाखा कार्यालय, अमरावती यांचा अहवाल मागविण्यात आला.

सहायक संचालक नगर आणि मुल्यनिर्धारण शाखा कार्यालय, अमरावती यांचे पत्र क्र. बां.प./मौ./नांदगाव पेठ भाग २/ता.जि.अम./स.नं.४६१/१/ब/क ससंनर-अम/३६८७/ दिनांक २८.११.२०२३ नुसार पत्रातील अटी व शर्तीनुसार बांधकामास शिफारस केलेल्या पत्राची मुळ प्रत व बांधकाम अभिन्यासाच्या मंजुरीच्या शिफारस प्रती प्राप्त झाल्या आहे.त्या अन्वये सहायक संचालक नगर आणि मुल्यनिर्धारण शाखा कार्यालय, अमरावती यांनी वरील पत्रान्वये खालील अटी व शर्तीसह बांधकाम परवानगी करीता नाहरकत दिलेली आहे.

**अटी व शर्ती पुढीलप्रमाणे-**

१) जागेचे मालकी हक्कसंबंधाने सविस्तर खातरजमा महसुल विभागाने प्रथमत: करणे आवश्यक आहे.

२) प्रादेशिक योजना क्षेत्रासाठी शासनाच्या नगर विकास विभागाचे दि.२१.११.२०१३ पासून लागु केलेल्या प्रमाणित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र.६.२.११ नुसार उपरोक्त क्षेत्रासाठी सुरक्षा अनामत ठेव जमा करण्याबाबत तरतुद करण्यात आलेली आहे. तथापि याबाबतचे दर व कार्यपध्दती अद्याप शासना कडून विहित करण्यात आलेली नाही. त्यामुळे संबंधित अर्जदार भुखंडधारक/विकासकर्ते यांचेकडून बंधपत्र बांधकाम नकाशा मंजुरी पूर्वी सादर करुन घेण्यात यावे.सदर बंधपत्र अर्जदार भुखंडधारक/विकासकर्ते यांच्यावर बंधनकारक राहील.

तहसिलदार अमरावती

३) विषयांकित बांधकाम नकाशाची छानणी प्रस्तावासोबत असणाऱ्या कागदपत्रांच्या आधारे केलेली आहे. (उदा. ७/१२ उतारा, नकाशा, अभियंता यांचे अनुज्ञाप्ती पत्र इ.) या कागदपत्रांच्या अधिकृततेबाबत व अद्यावत नोंदीबाबत महसुल विभागाकडुन खात्री करण्यात यावी.

४) प्रस्तुत बांधकाम नकाशांना आपणाकडुन मंजुरी अदा केल्या नंतर व बांधकाम परवानगी दिल्यानंतर सदर परवानगी ही १ वर्षाकरीता वैध राहील. त्यानंतर मुदतवाढ घेणे अर्जदार भुखंडधारक/विकासकर्ते यांचेवर बंधंनकारक राहील.

५) आपणाकडुन देण्यात आलेल्या बांधकाम परवानगी प्रमाणे बांधकाम सुरु असल्याची तपासणी नियमानुसार वेळोवेळी महसुल विभागाकडुन करुन घेण्यात यावी. तद्वतच जोता तपासणी व भोगवट प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे अर्जदारस भुखंडधारक/विकासकर्ते यांचेवर बंधंनकारक राहील.

६) अकृषक परवानगी आदेशातील अटी व शर्ती अर्जदार भुखंडधारक/विकासकर्ते यांचेवर बंधंनकारक राहील.

७) मंजुर प्रादेशिक योजना, अमरावती करीता लागु असलेल्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलितील तरतुदीप्रमाणे बांधकाम करणे व विषयांकित मंजुर वापराकरीताच सदर बांधकामाचा वापर करणे अर्जदार भुखंडधारक/विकासकर्ते यांच्यासह सर्व संबंधितांवर बंधंनकारक राहील.

८) मंजुर नकाशाप्रमाणे बांधकाम करण्याची सर्वस्वी जबाबदारीं अर्जदार भुखंडधारक/विकासकर्ते यांचेवर राहील. अन्यथा महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमांचे तरतुदीप्रमाणे अनधिकृत बांधकामावर रितसर कार्यवाही सक्षम प्राधिकरणाकडुन प्रस्तावित करण्यात येईल.

९) आजुबाजूचे वहीवाटीला बाधा होणार नाही, याची दक्षता अर्जदार भुखंडधारक/विकासकर्ते यांनी घेणे बंधनकारक राहील.

१०) महाराष्ट्र शासनाचे धोरणानुसार व मा. जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दिलेल्या निर्देशानुसार प्रस्तुतचे बांधकाम करताना छतावरील पावसाचे पाणी संकलन करुन त्यांचे जमीनीमध्ये पुर्नभरण करण्याचे प्रकल्पाचे (Rain Water Harvesting) बांधकाम करणे अर्जदार भुखंडधारक/विकासकर्ते यांनी घेणे बंधनकारक राहील.

११) सौर उर्जेवर पाणी तापविणे व अग्नीशमन व्यवस्था, प्रस्तावित उद्वाहीनी इत्यादी बाबी विकसीत करणे अर्जदार भुखंडधारक/विकासकर्ते यांचेवर बंधनकारक राहील. व त्या भोगवट प्रमाणपत्र घेणेपुर्वी वापर योग्य विकसित करणेही त्यांचेवर बंधनकारक राहील. या सुविधा वापरणाऱ्या सर्व संबंधीतांवर उक्त सुविधा विकसित झाल्यानंतर व वापरात आल्यानंतर सुस्थितीत व वापरात ठेवणे आवश्यक व बंधनकारक राहील.

१२) बांधकाम नकाशातील गणितीय चुका वा जागेवर नकाशावर नमूद केल्या व्यतिरीक्त जादा बांधकाम असल्यास त्यास संबंधित देखरेख करणारे वास्तुशिल्पी व अर्जदार भुखंडधारक/विकासकर्ते जबाबदार राहतील.

१३) प्रस्तावासोबतच्या उपलब्ध कागदपत्राच्या आधारे या कार्यालयाने मंजुरीची शिफारस केली आहे. सदर्हु कागदपत्रे बोगस वा दिशाभूल करणारे असल्यास त्याच प्रमाणे प्रत्यक्ष जागेवर बांधकाम केले असल्यास सदरची शिफारस रद्द समजण्यात यावी.

१४) शासनाचे विविध स्वरुपातील कामगार कल्याण उपकरांसह अन्य सक्षम प्राधिकरण म्हणजे महसूल विभागाकडे अर्जदार भुखंडधारक/विकासकर्ते यांनी भरणे आवश्यक व

बंधनकारक राहील व अशा करांचा भरणा सक्षम प्राधिकारी म्हणुन आपले स्तरावर करुन घेणे अभिप्रेत व आवश्यक आहे.

वरील अटी व शर्तीनुसारच आवेदकास जोता पातळी (Plinth Level) पर्यंत बांधकामाची परवानगी देण्यात येत आहे. त्यानंतर जोता तपासणी प्रमाणपत्र घेवूनच पुढील बांधकाम प्राप्त करुन घ्यावी.

तहसिलदार अमरावती

**प्रतिलीपी :-**

१) मा. उपविभागीय अधिकारी अमरावती यांना माहितीस सविनय सादर
२) सहायक संचालक नगर रचना मुल्यनिर्धारण विभाग अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता.
३) उपअधिक्षक भूमी अभिलेख अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता.
४) तलाठी मौजा नांदगाव पेठ भाग २- ता.जि.अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता.
५) सिटीलॅन्ड एंपायर भागीदारी फर्म तर्फे भागीदार सुभाष नानकराम तलडा व इतर ५ रा. अमरावती, ता,जि.अमरावती यांना माहितीस रवाना.

तहसिलदार अमरावती

तहसिलदार अमरावती